आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

१४ जानेवारी २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारतीय हवामान विभागाचा दीडशे वर्षांचा प्रवास हा आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा भारतातला प्रवास असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ मिशन मौसमचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवसानिमित्त केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते निवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव

- मकरसंक्रांतीचा राज्यात सर्वत्र उत्साह/ नायलॉन मांजाचा नाशिकमध्ये एक बळी

**आणि**

- खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारताची विजयी सलामी

**<><><><><><>**

“भारतीय हवामान विभागाचा दीडशे वर्षांचा प्रवास हा आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा भारतातला प्रवास आहे”, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं भारतीय हवामान विभागाच्या दीडशेव्या स्थापना दिवसानिमित्त आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. दीडशे वर्षांचा हवामानशास्त्र विभागाचा प्रवास हा देशाच्या विज्ञानप्रवासाचं प्रतीक आहे असं ते यावेळी म्हणाले. हवामानशास्त्र विभागाच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त एका विशेष नाण्याचं अनावरणही

त्यांनी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी मिशन मौसमचा आरंभ केला. मिशन मौसम हा उपक्रम देशाला हवामानबदलाच्या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी सहाय्यक ठरेल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट.....**

देशाला आपत्ती व्यवस्थापनासाठी हवामान विभागाची बहुमोल मदत होत असल्याचं ते म्हणाले. हवामान अंदाज, हवामान व्यवस्थापन आणि हवामानबदलाचे दुष्परिणाम कमी करणे यासंबधीचं धोरण असलेल्या IMD विजन-२०४७ चे प्रकाशनही त्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्र दौऱ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्या मुंबईत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या दोन युद्धनौका, तर आयएनएस वाघशीर ही पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होतील. याशिवाय, प्रधानमंत्री नवी मुंबईत इस्कॉनच्या श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही करणार आहेत.

**<><><><><>**

संरक्षण दलातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आज सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवस साजरा होत आहे. या निमित्त नागपूरच्या वायुसेनानगर इथं मेंटेनन्स कमांडच्या मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी निवृत्त कर्मचाऱ्यांचा

गौरव केला. संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण होणं आवश्यक असून विश्वशांती आणि अहिंसा प्रस्थापित करण्यासाठी संरक्षण दलाच्या तिन्ही दलाची भूमिका महत्वाची असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. कारगिलच्या सोनमर्ग बोगद्याच्या उद्घाटन प्रसंगी उणे ४ अंश सेल्सिअस इतक्या कमी तापमानात आणि  कठीण परिस्थितीत सैनिक आपल्या देशाचं रक्षण करतात हे आपण अनुभवलं असल्याचं गडकरी यांनी यावेळी नमूद केलं. सशस्त्र दलातल्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी कल्याणकारी योजना मदतकक्ष स्थापन करण्यात आला असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट....गडकरी**

सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवसाच्या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवृत्त सेना कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात त्यांनी सेना कर्मचाऱ्यांचा त्याग, शौर्य आणि देशाच्या संरक्षणासाठी त्यांनी दिलेलं योगदान यांचा गौरव केला आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, भारतीय सेना दिवसानिमित्त लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांचा विशेष संदेश आज रात्री ८ वाजता आकाशवाणीवरुन प्रसारित होणार आहे. त्यामुळे रात्री प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्या ८ वाजून १० मिनिटांनी प्रसारित होतील.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्था - एनटीएनं उद्या १५ जानेवारीला नियोजित युजीसी नेट परीक्षा पुढे ढकलली आहे. पोंगल, मकरसंक्रांत आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर ही परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी करण्यात येत होती, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचं एनटीएनं निवेदनाद्वारे कळवलं आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचा ई-मोबिलिटी या विषयातला ऑनलाइन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम येत्या मार्चपासून सुरू होणार आहे. १८ महिन्यांचा हा अभ्यासक्रम 'ग्रेट लर्निंग' या संस्थेच्या सहकार्यानं आयआयटी मुंबईच्या प्राध्यापकांनी तयार केला आहे. या क्षेत्रात काम करणारे, वैज्ञानिक, संशोधक यांना या अभ्यासक्रमाचा लाभ होईल. यात इलेक्ट्रिक वाहनांचं डिझाइन, बॅटरी तंत्रज्ञान यासह इतर विषयांवर लक्ष केंद्रित केलं आहे.

**<><><><><>**

या हंगामात देशातल्या ६३२ लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिकांची लागवड झाली आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं आज प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे. गव्हाच्या लागवडीत गेल्या वर्षीपेक्षा वाढ झाली असून यंदा ३२० लाख हेक्टरवर गहू लावण्यात आला आहे. डाळींची लागवड १३९ लाख हेक्टरवर तर भरडधान्याची लागवड ५३ लाख

हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर झाल्याचं या अहवालात म्हटलं आहे. तसंच ९६ लाख हेक्टरपेक्षा जास्त तेलबियांची लागवड झाली आहे.

**<><><><><><>**

मकरसंक्रांतीचा सण आज राज्यात उत्साहाने साजरा होत आहे. तीळगूळ घ्या गोड बोला असं आवाहन करत संक्रांती निमित्त शुभेच्छांची देवाण घेवाण होत आहे. घरोघरी ताजे हरभरे, उसाचे करवे बोरं आणि सौभाग्यचिन्हांनी सजलेल्या मातीच्या सुगडांचं पूजन आज केलं जातं. याशिवाय दानधर्महीी केला जातो. राज्यात ठिकठिकाणच्या मंदिरांमधे संक्रांतीनिमित्त देवदर्शनासाठी गर्दी झाली आहे. मंदिरांना सजावट करण्यात आली आहे.  नाशिकमध्ये गोदावरी नदीत रामकुंडावर स्नानासाठी गर्दी झाली आहे.

ठिकठिकाणी पतंग उडवण्याचा खेळ रंगला आहे. घातक मांजाच्या वापरावर बंदी घालण्यात आली असून पोलीस आणि प्रशासनानं अनेक ठिकाणी कारवाई करुन नायलॉन मांजाचे साठे जप्त केले आहेत. नागपूर शहरात विवीध कारवाईत जप्त केलेला नायलॉन मांजा पोलीसांकडून नष्ट करण्यात आला. नागपुरातल्या जरीपटका पोलिस ठाण्याच्या हद्दीत इंदोरा मैदानात रोड रोलर फिरवून जप्त केलेला नायलॉन मांजा नष्ट करण्यात आला. जवळपास १८ लाख किमतीचा नायलॉन मांजा पोलीसांकडून नष्ट करण्यात आला.

नाशिकमधे नायलॉन मांजाच्या विरोधात पोलिसांनी कडक भूमिका घेतली असून काल एका दिवसात २४ गुन्हे दाखल करण्यात आले. यात ३३ जण आरोपी असून ९ मुले अल्पवयीन असल्याने त्यांच्या पालकांविरूध्द सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आज संक्रांतीच्या दिवशी नाशिक पोलीस साध्या वेशात पायी गस्त घालत असून नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्यांवर तातडीनं गुन्हे दाखल करून गंभीर कारवाई करण्यात येत आहे.

**नाशिक** शहरात पाथर्डी फाट्या जवळ दुचाकीवरुन जाणाऱ्या २२ वर्षाच्या युवकाचा नायलॉन मांजाने गळा कापला गेला, आणि त्याचा मृत्यू झाला. भंडारा जिल्ह्यात लाखनी इथं उड्डाणपुलावरुन जाणाऱ्या तरुणाला नायलॉन मांजा गळ्यात अडकून गंभीर दुखापत झाली. गळ्याला झालेल्या जखमेमुळं मोठा रक्तस्त्राव झाला. स्थानिकांनी त्याला ताबडतोब उपचारासाठी रुग्णालयात नेलं. २४ वर्ष वयाचा हा तरुण गोंदिया जिल्ह्यातल्या गोरेगावचा रहिवासी आहे.

**<><><><><><>**

सोलापूर महापालिकेचे माजी महापौर महेश विष्णूपंत कोठे यांचं आज सकाळी उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते साठ वर्षांचे होते. कोठे प्रयागराज इथं कुंभमेळ्याला गेले होते. आज सकाळी स्नान करत असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. सोलापूर महापालिकेच्या राजकारणावर वर्चस्व असलेला नेता अशी महेश

का◌ेठे यांची ओळख होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते असणाऱ्या महेश कोठे यांनी शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती.

<><><><><>

खो-खो विश्वचषक स्पर्धेला काल नवी दिल्ली इथे सुरुवात झाली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्ष पी. टी. उषा आणि भारतीय खोखो महासंघाचे अध्यक्ष सुधांशु मित्तल यांनी मशाल प्रज्ज्वलित करून स्पर्धेचं औपचारिक उद्घाटन केलं.

या स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात भारतीय संघाने नेपाळवर ४२-३७ असा विजय मिळवला. भारतीय संघाचा आदित्य गणपुले याची सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली तर शिवा रेड्डी सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू ठरला. नेपाळच्या संघाकडून रोहित कुमार या खेळाडूला सर्वोत्तम बचाव करणारा खेळाडू म्हणून गौरवण्यात आलं.

भारताच्या महिला संघाचा पहिला सामना आज नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी मैदानावर दक्षिण कोरियासोबत होणार आहे. तर पुरुषांच्या संघाची गाठ आज रात्री सव्वा आठ वाजता ब्राझीलच्या संघाशी पडणार आहे.

//<><><><><>//